# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| | | |
|---|---|---|
| **पीक व वाण** | : | **तेलताड** |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २००७** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | महाराष्ट्रातील कोकण विभागात तेलताडाच्या लागवडीकरिता हिवाळयामध्ये (ऑक्टोबर-जानेवारी) दररोज ५० लिटर पाणी प्रती झाड ठिबक सिंचनाव्दारे किंवा ४०० लिटर पाणी प्रती झाड दर चार दिवसांनी आळयातून द्यावे. उन्हाळयामध्ये (फेब्रुवारी-मे) दररोज ८० लिटर पाणी प्रति झाड ठिबक सिंचनाव्दारे किंवा ६३० लिटर पाणी प्रती झाड ४ दिवसाच्या अंतराने आळयातून द्यावे. जून किंवा जुलै महिन्यात प्रत्येक झाडास १२००, ६०० आणि २७०० ग्रॅम अनुक्रमे नत्र, स्फुरद आणि पालाश देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१८** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | दक्षिण कोकण विभागात तेल ताडाच्या बागेत सुरुवातीच्या कालावधीत (५ वर्षापर्यंतत) किफायतशीर उत्पन्नाकरिता केळी, अननस आणि सुरण या पिकांची मिश्रपिक म्हणून लागवड करण्याची शिफारस करण्यात येते. |